14 TO 20 JUNE 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 12/06/2021 7:22 PM Page 1

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : २५ | सोमवार दि. १४ जून २०२१ ते रविवार दि. २० जून २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

## संपादकीय

### प्रतिक्षा घड्याळाचे काटे फिरण्याची!

राजकीय पक्ष म्हटला की त्याला राजकारणात अनेक चढउतारांचा सामना करावा लागतो आणि त्या अनुभवातून चिंतन करूनच पुढील दिशा ठरवावी लागते, तरच जनाधार मिळतो आणि जनाधार किती आहे यावरच पुढे सत्तेचे गणित अवलंबून असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेला २२ वर्षे झाली आणि हा दोन दशकांचा काळ काही कमी नाही. या दोन दशकात पक्षाची व्याप्ती आणि राजकीय दरारा जितका वाढायला हवा होता तितका वाढला नाही आणि हीच राष्ट्रवादीची खरी शोकांतिका आहे. विशेष म्हणजे शरद पवार यांच्यासारखे राजकारणातल्या भीष्म पितामह यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व असताना घड्याळाचे काटे ज्या वेगाने फिरायला हवे होते ते फिरलेच नाही. कदाचित प्रत्येक वेळी योग्य टायमिंग साधण्यात कुठेतरी चुका झाल्या असाव्यात म्हणूनच २२ वर्षापूर्वी पक्ष जिथे होता तिथेच तो आजही आहे. परिणामी आज राष्ट्रवादीची प्रादेशिक पक्षासारखी अवस्था झालीय. आज शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षाने सुद्धा राष्ट्रवादीला मागे टाकले आहे. या सगळ्या गोष्टीबाबत पवारांनी नव्याने आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. २२ वर्षापूर्वी सोनिया गांधींच्या विदेशी नागरिकत्वाचा मुद्दा उपस्थित करून काँग्रेस पक्षाची साथ सोडली आणि राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. त्यानंतर झालेल्या विधानसभेत घवघवीत यश मिळवले. पण शेवटी सरकार स्थापन करण्यासाठी त्यांना काँग्रेसचीच मदत घ्यावी लागली होती. त्यानंतर गेल्या २२ वर्षांत राष्ट्रवादीला स्वबळावर महाराष्ट्रात सत्ता ही स्थापन करता आली नाही किंवा महाराष्ट्राच्या बाहेर पक्षाचा जनाधार सुधा वाढवता आला नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांची धेय्यधोरणे सारखीच आहेत. शिवाय दोघांचीही दलीत मुस्लिम मतदारांवर भिस्त आहे असे असताना सोनिया गांधींच्या विदेशी पानाचा मुद्दा उपस्थित करून पवार काँग्रेस पासून वेगळे का झाले होते तेच कळत नाही. बरे वेगळे झाल्यावर आपल्या पक्षाचा त्यांनी प्रभाव वढवण्याऐवजी पुन्हा सत्तेसाठी काँग्रेस बरोबर गेले. कदाचित त्यांची हीच कृती लोकांना पटली नाही. राजकीय पुढारी लोकांमध्ये भलेही विश्वसनीयता नसली तरी जनता मात्र विश्वासनियतेच्या कसोटीवरच नेत्यांना तपासून बघत असते. म्हणूनच आज राजकारणात पवारांसारखे राजकीय धुरंदर नेते मागे पडत चालले आहेत आणि मोदी सारखे नेते विश्वासनियतेच्या आभास निर्माण करून पक्षाचा जनाधार वाढवणयात यशस्वी ठरून सत्तेपर्यंत पोहचले आहेत. अन्यथा मोदींचे आणि भाजपचे काय होते या देशात? पण लोकांच्या मनात नेमके काय आहे याचा अभ्यास करून लोकांच्या भावनांना देशव्यापी बनवण्याचे काम भाजपने केले. त्याच्या जोरावर निवडणुका जिंकून केंद्रातली सत्ता मिळवली. या उलट पवार आणि त्यांच्या पक्षातल्या लोकांनी महाराष्ट्राच्या बाहेर पडण्याचा फारसा प्रयत्नच केला नाही. राष्ट्रवादीकडे छगन भुजबळ यांच्यासारखे प्रबळ बहुजन नेते होते आणि त्यांनी समता परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सीमाही ओलांडल्या होत्या. अशावेळी राष्ट्रवादीने भुजबळांच्या मागे जर पक्षाची ताकद उभी केली असती तर मोठ्या प्रमाणावर बहुजन समाज राष्ट्रवादीच्या झेंड्याखाली एकवटला असता, पण तसे झाले नाही. उलट समता परिषदेच्या माध्यमातून भुजबळ मोठे झाले तर आपल्या नेतृत्वाला पक्षात पर्याय निर्माण होईल आणि त्याचा फटका पक्षातील आपल्या रक्ताच्या नात्यातील माणसांना बसेल या भीतीने पवारांनी समता परिषदेलला दूर ठेऊन भुजबळांचे पंख छाटण्याचा प्रयत्न केला अशी लोकांमध्ये चर्चा सुरू झाली. परिणामी जो बहुजन समाज राष्ट्रवादीच्या जवळ यायला हवा होता तो दूर गेला. परिणामी महाराष्ट्राच्या बाहेर तर सोडाच महाराष्ट्रात सुद्धा राष्ट्रवादीचा स्वबळावर सत्ता मिळवण्याइतका जनाधार वाढवू शकला नाही. त्यामुळेच आज शिवसेनेसारख्या जातीयवादी पक्षाच्या मांडीला मांडी लावून बसण्याची पाळी आली. पश्चिम महाराष्ट्रात पवारांची मोठी ताकत आहे. पण याच तात्कीची व्याप्ती कोकण, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र किंवा विदर्भात का होऊ शकली नाही. आज महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईमध्ये सुद्धा राष्ट्रवादीची फारशी ताकत नाही. व्यापारी दृष्ट्या जशी मुंबईची फार मोठी टाकत आहे. तशीच राजकीय दृष्ट्याही ताकत आहे. मुंबईतून ६ खासदार, ३४ आमदार आणि २२७ नगरसेवक निवडून जातात. त्यामुळे मुंबईत पक्षाची ताकद निर्माण करणे आवश्यक होते की मुंबईच्या राजकारणात मुरलेले भुजबळ आणि सचिन अहिर यांच्या सारखे नेते राष्ट्रवादी कडे होते. सचिन अहिर यांच्या हाती तर राष्ट्रीय मिल मजदुर संघ या सारखी मोठी कामगार संघटना होती. शिवाय माथाडी कामगार संघटना सुधा पवारांच्या प्रभावाखाली होत्या. तरीही राष्ट्रवादीला मुंबईमध्ये जनाधार वाढवता आला नाही. कदाचित यामुळेच सचिन अहिर राष्ट्रवादी सोडून शिवसेनेत गेले असावे. अर्थात ते काही असो महाराष्ट्राच्या राजकारणात भलेही पवारांचा आणि राष्ट्रवादीचा बोलबाला असला तरी सुद्धा राष्ट्रवादी आजही २२ वर्षापूर्वी जिथे होता तिथेच आहे. इतरांच्या मदतीने सत्तेत जाणे आणि तिथे टिकून राहणे या पेक्षा स्वतःच्या हिमतीवर आणि ताक्तीवर जर राष्ट्रवादीने सत्ता मिळवली असती तर गेल्या २२ वर्षात खरोखरच राष्ट्रवादीने काहीतरी करून दाखवले असे म्हणता आले असते. पण आज राष्ट्रवादी ज्या ठिकाणी आहे ते पाहता जनाधार वाढवण्यासाठी पक्षाने फारसे काही केलेलेच नाही असे म्हणावे लागेल. राष्ट्रवादीत तरुण नेत्यांचा भरणा आहे आणि जेंव्हा तरुणांच्या हाती नेतृत्वाची बागडोर असते तेंव्हा ते पक्षाचा जनाधार वाढवण्यासाठी सतत काहीतरी करीत असतात. पण दुर्दैवाने राष्ट्रवादीत तसे काही झाले नाही. त्यामुळे पक्ष मागे पडला आणि पवारांचे कुशल नतृत्व असतानाही पक्षाची ताकद आणि जनाधार वाढू शकला नाही हीच राष्ट्रवादीची खरी शोकांतिका आहे. अजूनही वेळ गेलेली नाही, कार्यकर्त्यांची जर मजबूत फळी उभारण्यात आली आणि पक्षाची संघटनात्मक ताकत वाढवण्यात आली, तर निश्चितपणे राष्ट्रवादी हा शिवसेनेच्याही पुढे जाईल. मात्र त्यासाठी पक्षावर लोकांचा विश्वास बसायला हवा. जेणेकरून मोठ्या संख्येने लोक पक्षाकडे आकर्षित होतील त्यातून पक्षाची ताकत वाढेल आणि ही वाढलेली ताकतच भविष्यात पक्षाला स्वबळावर सत्ता मिळवून देईल.

# दलितांनो पाणी हवे असेल तर तुमच्या बायका आणा
# युवासेना पदाधिकाऱ्याचा संतापजनक मराठी बाणा

पाथर्डी/लक्ष्मण उजागरे

महाराष्ट्रात दलित मागासवर्गीयांच्या सुरक्षेसाठी असलेलेल्या ॲट्रॉसिटी कायद्यात सुधारणेच्या नावाखाली पळवाटा ठेवण्यात आल्याने दलितांचा द्वेष करणारे काही उच्च वर्णीय इतके माजले आहेत कि आता ते दलितांना पाणी द्यायला सुद्धा तयार नाहीत. 'पाणी हवे असेल तर तुझ्या बायकोला दोन दिवस माझ्याकडे पाठवून दे' अशी भाषा करायला लागलेत. त्यामुळे या हरामखोरांच्या पार्श्वभागात बांबू घालण्यासाठी ॲट्रॉसिटी कायदा पुन्हा होता तसाच करावा आणि गावात जातीच्या नावाखाली दलितांना पाणी द्यायलाही विरोध करणाऱ्या हरामखोरांना तुरुंगात डांबून त्यांची मुजोरी उतरवावी अशी मागणी आता महाराष्ट्रातील दलित मागासवर्गीय समाज करीत आहे आणि त्याला कारण ठरली आहे बीड जिल्ह्याच्या पाथर्डी तालुक्यातील खेर्डा गावातील एक संतापजनक घटना या गावातील महिला सरपंच नंदा आम्ले हिचा पती रामचंद्र आम्ले या युवा सेनेच्या जातीयवादी गुंडाने आपल्या गुंडगिरीच्या जोरावर गावातील गोरगरीब दलितांचे जगणे मुश्कील केले आहे. तसेच कुणी त्याला जाब विचारल्यास जातीवाचक शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी देतोय. दारूच्या नशेत राजरोसपणे गावातल्या महिलांना पाहून अश्लील बोलणे, अश्लील हातवारे करणे असे निर्लज्ज प्रताप त्याने सुरु केले आहेत. नुकतेच त्याने ग्रामपंचायतीचे पिण्याचे पाणी दलितांना देण्यास मज्ज्ञाव करताना पाणी हवे असेल तर तुमच्या बायकांना दोन दिवस आमच्याकडे पाठव असे म्हणत विकास गंगाधर वाहेल याला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच ठार मारण्याची धमकी दिली. त्याची पत्नी सरपंच असल्यामुळे हा गाव आपल्या बापाच्या मालकीचा आहे असे समजणाऱ्या या गुंडावर अखेर पोलिसांनी ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. ...पान २ वर

### गुंड रामचंद्र आम्ले आणि दगडू आम्ले यांच्यामुळे गावातच नव्हे तर जिल्ह्याला जातीय दंगलीचा धोका!

खेर्डा गावात आजवर दलित आणि सवर्ण समाज गुण्या-गोविंदाने राहत होता. पण नंदा आम्ले सरपंच बनताच तिचा पती असलेला युवा सेनेचा जिल्हा पदाधिकारी रामचंद्र आम्ले याने गावात उच्छाद मांडला आहे. गावातील दलीत मागासवर्गीयांचे या माणसाने जिने हराम केले आहे. खास करून महिलांची छेडछाड करणे, पाणी हवे असेल तर तुमच्या बायका आण अन्यथा तुमचे सर्व रस्ते आणि व्यवहार बंद करू अशा धमक्या हा गुंड देत असतो. त्यामुळे या हरामखोरांवर जर कारवाई झाली नाही, तर केवळ गावातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात दलित विरुद्ध सवर्ण असा संघर्ष भडकू शकतो अशी भीती व्यक्त केली जात आहे. तसेच युवा सेनेच्या नावावर गुंडागर्दी आणि जातीयवाद करणाऱ्या या हरामखोराला आदित्य ठाकरे यांनी युवा सेनेतून काढून टाकावे अशीही मागणी केली आहे.

## बँक मॅनेजरची हत्या करून २५ लाख लुटले



वाराणसी/अजयकुमार उपाध्याय

योगींच्या युपीमध्ये गुन्हेगारीत दिवसेंदिवस वाढ होत चालली असून पंजाब नॅशनाल बँकेच्या मॅनेजरची कार अडवून चार बदमाशांनी त्याची हत्या करून त्याच्याकडचे २५ लाख लुटले. या घटनेमुळे वाराणशीत मोठी खळबळ माजली आहे. पी. सी. राम हे पंजाब नॅशनल बँकेच्या करखियाव शाखेत व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. बुधवारी संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारासस ते एका टुरिस्ट स्कॉर्पियो गाडीने पैसे घेवून जात असताना वाराणसीच्या बाबतपूर विमानतळाजवळ दुसऱ्या एका स्कार्पियो कार मधून आलेल्या लुटारुंनी त्यांची कार अडवली आणि त्यांच्यावर अगदी जवळून गोळीबार करून त्यांची हत्या केली. या घटनेने घाबरलेला ...पान २ वर

## रोजच्या भांडणाच्या सोसवेना कळा अखेर सुनेने सासूचाच चिरला गळा

भुसावळ/क्राईम रिपोर्टर



मयत द्वारकाबाई

सासू सुनांचा वाद काही नवा नाही. मात्र हे वाद जास्त वाढू नयेत यासाठी कुटुंब प्रमुखाने लक्ष देणे गरजेचे असते. पण कुटुंब प्रमुख अशा वादांमध्ये किती लक्ष देणार बरे. आईची बाजू घेतली तर पत्नीला राग येतो आणि पत्नीची बाजू घेतली तर आई नाराज होते. त्यामुळे आई आणि पत्नीच्या वादात कुटुंब प्रमुख असलेल्या इसमाचे अक्षरशः सॅन्डविच झालेले असते. भुसावळमध्ये एका शाळेवर वॉचमन म्हणून काम करणाऱ्या रविंद्रचे सुद्धा असेच झाले होते. त्याची मुले मोठी झाली. मुलीचे लग्न झाले, तरी त्याची पत्नी आणि सासू मधला वाद सुरु होता. त्यांच्या नेहमीच्या भांडणाला तोही कंटाळला होता. म्हणून त्याने त्या दोघींकडे दुर्लक्ष केले आणि इथेच त्याची चूक झाली. कारण एकेदिवशी त्याच्या पत्नीने सासूचा कोयत्याने गळा चिरून तिला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सुनेला अटक केली आहे.





आरोपी उज्वला





रविंद्र पंढरीनाथ सोनवणे हा भुसावळ येथील पद्मबाई कपुरचंदजी कोटेचा महिला विद्यालयात वाचमन म्हणून कामाला आहे. गेल्या आठ महिन्यापासून तो या शाळेत वाचमनची नोकरी करत आहे. तो काम करत असलेल्या शैक्षणिक संस्थेने त्याला शाळेच्या आवारात राहण्यास एक खोली दिली होती. या खोलीत तो, त्याची पत्नी उज्वला व आई द्वारकाबाई यांच्यासह रहात होता. सुमारे बाविस वर्षापुर्वी रविंद्रचा विवाह चोपडा तालुक्यातील...पान २ वर

## अनैतिक संबंधाचा गावात होताच बोभाटा प्रियकराच्या मदतीने पतीचा काढला काटा

बेळगाव (कुडची)/क्राईम रिपोर्टर

सुखाच्या संसारासाठी केवळ धन संपत्ती असून चालत नाही, तर पती पत्नीमध्ये प्रेम आणि विश्वासाचे नाते असावे लागते आणि हे नाते तेंव्हाच निर्माण होते जेंव्हा पती त्याच्या पत्नीच्या सर्व गरजा पूर्ण करतो. खास करून शरीरसुखाची गरज खूप महत्वाची असते. हीच गरज पूर्ण होत नसल्याने चिचंली येथील एका महिलेने दुसऱ्या तरुणाला जवळ केले. मात्र हे पतीला समजताच पती पत्नी मध्ये भांडणे होऊ लागली. अखेर या भांडणाला कंटाळून एकेदिवशी पत्नीने तिच्या प्रियकराला आपल्या पतीचा काटा काढायला सांगितला. त्यानुसार प्रियकराने आपल्या साथीदाराच्या मदतीने तिच्या पतीची हत्या केली. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने या हत्याकांडाचा पर्दाफाश करून सर्व आरोपींना अटक केली.



मायाक्का चिचंली हे जागृत देवस्थान म्हणून पश्चिम महाराष्ट्रात आणि कर्नाटकात प्रसिध्द आहे. सौंदती येथील रेणुका देवीचे दर्शन घेतल्यानंतर मायाक्का देवीचे दर्शन घेणेसाठी भाविक येत असतात. तसे चिंचली हे गाव सधन शेतकऱ्याचे गाव म्हणून ओळखले ...पान २ वर

## पतीची हत्या करून कोरोनाने मेल्याचा बनाव केला पण निगेटिव्ह अहवाल येताच पापाचा पर्दाफाश झाला



मयत मनोहर

पुणे/क्राईम रिपोर्टर

कोरोनाच्या संकट काळात अशाही काही घटना घडल्या आहेत कि ज्यांनी पोलीस आणि डॉक्टरांच्या सुद्धा पायाखालची जमीन सरकली. बहुसंख्य लोकं कोरोनाच्या भीतीने थरथरत असताना काही लोकांनी मात्र कोरोनाचा फायदा घेत आपले पाप कोरोनाच्या पांघरुणाखाली लपवण्याचा प्रयत्न केला. उरळी काचंन येथील अश्विनी या विवाहित महिलेने तसेच केले. लग्नापूर्वी तिचे दुसऱ्या तरुणाशी प्रेम संबंध होते आणि लग्नानंतर सुद्धा त्यांच्या भेटीगाठी सुरु होत्या. पण त्यांच्या या संबंधात पतीचा अडसर होता तो दूर करण्यासाठी तिने प्रियकराच्या मदतीने पतीची गळा दाबून हत्या केली आणि तो कोरोनाने मेला असे चाचणी केली असता ती निगेटिव्ह येताच पत्नीचा बनाव सर्वांच्या सांगितले. पण डॉक्टरांना संशय आल्याने त्यांनी मृतदेहाची कोरोन चाचणी केली असता अहवाल निगेटिव्ह आला. त्यामुळे पोलिसांनी आरोपी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक केली.

फुरसंगी येथील गौरव सुतार याचे अश्विनीवर मनापासून प्रेम करीत होता. ती ही त्याचेवर तितकीच प्रेम करीत होती. गेल्या दोन तीन वर्षापासून त्याचे प्रेमप्रकरण चालू असल्याने ते दोघे ही भेटत होते. एकमेकांच्या भावी आयुष्याची स्वप्ने पाहत होते. फोन वरून दिवस रात्र एकमेकांशी चॅटिंग करीत मौजमस्ती करण्यात गुंग असताना अश्विनीच्या घरच्या लोकांना त्या दोघांच्या ...पान २ वर

## इंन्टाग्रामवरच्या मित्रांकडून विश्वासघात झाला वाढदिवसाच्या पार्टीला नेऊन बलात्कार केला





मुंबई/राजेंद्र वेदांते

आजकाल मुला-मुलींमधील फ्रेन्डशिप धोक्याच्या वळणावर येऊन पोहचली आहे. फेसबुक इंन्टाग्रामच्या माध्यमातून एकत्र आलेले मित्र मैत्रिणी परस्परंवर विश्वास ठेवून एकमेकांच्यात मिसळतात. पण त्यांच्या याच मनमोकळे वागण्यातून कधी तरी त्यांचा घात होतो. एक अल्पवयीन मुलगी अशीच आपल्या मित्राच्या वाढदिवसाला गेली होती. पण त्या मित्रांनी तिचा विश्वासघात करून चार पैकी दोघांनी तिच्यावर कारमध्ये बलात्कार केला. त्यामुळे ती घाबरून दुसऱ्या मित्राच्या घरी गेली, त्यानेही बलात्कार केला. त्यानंतर तिसऱ्याकडे मदत मागायला गेली असता त्यानेही बलात्कार केला. या प्रकरणी दोघांना अटक केली असून दोघे फरार आहेत.

एका अल्पवयीन मुलीवर एकाच रात्री तीन वेगवेगळ्या ठिकाणी सामूहिक बलात्कार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार करणाऱ्या आरोपींना अटक करून त्यांना जबर शिक्षा होणे हे आता कॉमन झाले आहे.गुन्हेगारांना कठोर शिक्षा होऊनही अशा घटना सतत घडत आहेत. हे गुन्हे अगदी सहजपणे होताना दिसत आहेत. तरूणींवर सामुहिक बलात्कार करणाऱ्या आरोपींना कायद्याचे भय बिलकुल वाटत नाही. त्यामुळेच हे गुन्हेगार मुलींना नासवण्याचे कुकर्म बिनदिक्कतपणे करीत आहेत. अशा आरोपींच्या जाळ्यात अल्पवयीन मुली सहजपणे अडकत असल्यामुळे या समाजकंटकांची सख्या वाढत आहे. हि चिंतेची बाब आहे. ना कायद्याच भय ना पीलीसांचं भय नसल्यामुळे हे नराधम अल्पवयीन मुलींना सॉफ्ट टार्गेट बनवत आहेत. कधी फेसबुक कधी इन्स्टाग्रामवर मैत्री करून मुलींना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढत या मुलींना फसवले जाते. त्यांना ...पान २ वर

## शेत जमिनीचा वाद विकोपाला गेला पुतण्याने आपल्या काकाचा खून केला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



मयत भगवान

ग्रामीण भागात शेती हेच पोटापाण्याचे मुख्य साधन असल्याने शेतकरी आपली एक इंचही जमीन सोडायला तयार नसतो. त्यामुळे शेत जमिनीवरून झालेले वाद कधी कधी इतके विकोपाला जातात कि माणूस रक्ताची नातीही विसरून जातो आणि आपल्याच सग्या सोयऱ्यांचा जीव घ्यायला मागे पुढे पाहत नाही. वरणगे पाडळी गावात २० गुंठे जमिनीतील ५ गुंठ्यांवरून दोन सख्या भावांमध्ये वाद होता. हा वाद मिटवणे गावच्या तंटामुक्ती समितीलाही जमले नाही आणि एकेदिवशी वादग्रस्त ५ गुंठे जमिनीवर एका भावाने गोठा बांधायला घेताच दोन भावांमध्ये जुंपली. यावेळी एका भावाच्या मुलाने आपल्या काकाला आणि त्याच्या मुलाला चाकूने भोसकले. यात काकाचा मृत्यू झाला, तर त्याचा मुलगा म्हणजे आरोपीचा चुलत भाऊ गंभीर जखमी झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बाप बेट्यांना अटक केली आहे.



आरोपी संदीप



करवीर तालुक्यातील वरणगे पाडळी येथे मांतग वसाहतीत भगवान रामचंद्र बुचडे आणि भैरवनाथ रामचंद्र बुचडे हे दोघे सख्ये भाऊ आपआपल्या कुंटूबासह राहयला आहेत या दोघा भावाना चार बहिणी ही आहेत. भगवान आणि रामचंद्र याची मुले मोठी झाली तरीही त्याच्या जागेच्या वाटणीचा वाद अजून मिटलेला नव्हता. घराशेजारीच या दोघात घराशेजारी असणाऱ्या वीस गुंठे शेतजमीनी पैकी पंधरा गुंठे ही शेतीची जमीन आहे तर उर्वरीत पाच गुंठे शेतजमीन ही पडून आहे. या दोघांच्या वादात ही पाच गुंठे शेतजमीन अजूनही अडकलेली होती. त्या जमीनीची सरस मनाने ...पान २ वर

CMYK

14 TO 20 JUNE 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 12/06/2021 7:24 PM Page 1



# दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला अटक

## लातूर शहर डीवायएसपी पथकाची धडाकेबाज कामगिरी



**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील सिद्धेश्वर मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेऊन दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या दरोडेखोरांच्या टोळीला लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी पथकाने अटक करत धडाकेबाज कामगिरी केली आहे. या कारवाईत जायमोक्यावर तिघांना अटक कली असून दोन फ रार चोरट्यांना वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक केली आहे. याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की दिनांक २५ जून रोजी लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे हे रात्रिच्या गस्ती चे नियोजन करत असताना त्यांना एका गुप्त खबऱ्याकडून सिद्धेश्र्वर मंदिर परिसरातील कंपाऊंड जवळ एक टोळी संशयास्पद बसली असून दरोडा टाकण्याच्या तयारीत आसल्याची माहीती मिळाली. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे एक पथक तयार करण्यात आले. या पथकात सहायक फौजदार वाहिद शेख, पोहे आर. बी. ढगे ,महेश पारडे तसेच गांधी चौक पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक कव्हाळे, पोना. शिंदे, पोना. बस्के यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने सिद्धेश्र्वर मंदिराच्य उत्तर बाजूच्या कंपाऊंड लगत सापळा लावून दरोडेखोरांचा मागमूस काढला. याच दरम्यान पोलिसांची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेऊन या ठिकाण दोघेजण कंपाउंड वरून उड्या मारून आंधाराचा फायदा घेत पळून गेले. तर या ठिकाणाहून अजिंक्य नीळकंठ मुळे (वय २४ वर्षे राहणार उत्का तालुका औसा जिल्हा लातूर हल्ली मुक्काम जुना औसा रोड लातुर), विश्वजीत अभिमन्यू देवकते (वय २० वर्षे राहणार कातपूर तालुका जिल्हा लातूर) व गणेश महादेव माने (वय वर्षे १९ राहणार खुरी गल्ली) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे अधिक चौकशी ऊण अंगझडती घेतली असता अजिंक्य निळकंठ मुळे यांच्याकडे एक तलवार, विश्वजीत देवकते यांच्याकडे एक लोखंडी रॉड व गणेश माने त्याच्या खिशात मिरचीची पूड आढळून आली. त्यांना पळून गेलेल्या अन्य साथीदारांची नावे विचारली असता सुनील विठ्ठल भोसले (राहणार शिवाजीनगर वसवाडी) तर निलेश काळे (राहणार शिरूर आनंतपाळ हल्ली मुक्काम खर्डेकर स्टॉप लातूर) असे सांगितले .

उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांच्या फिर्यादीवरून गांधी चौक पोलिस ठाण्यात गुरनं. २९९ / २०२१ कलम ३९९ ४०२ १८८ २६९ २७० भादवि कलम ०४, २५ भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे तसेच कोवीड -१९ प्रतिबंधक अधिनियम २,३,४ प्रमाणे वरील पाच आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. वरील पाच ही गुन्हेगार सराईत असून त्यांना लातूर शहरात व इतर ठिकाणी माला विषयी व शारीरिकविषयी बरेच गुन्हे केलेले असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान २६ मे रोजी या प्रकरणातील फरार आरोपी सुनील भोसले व निलेश काळे यांच्या शोधासाठी पोलिसांचे हे पथक कार्य करत आसताना गुप्त माहिती आधारे या प्रकरणातील फरार आरोपी सुनील भोसले हा राजेशिवाजी नगर येथे मोटरसायकलवर येणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. यावरून लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या पोलीस पथकाने राजे शिवाजीनगर येथे सापळा लावून सुनील विठ्ठल भोसले यास मोटरसायकलसह अटक केली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता दोन दिवसापूर्वी मी व माझे इतर चार साथीदार सिद्धेश्वर मंदिर येथे चोरी करण्यासाठी बसलो होतो.

दरम्यान रात्री पोलीस आल्याचे पाहून मी आणि निलेश काळे तिथून पडून गेलो व त्याच रात्री मी मजगे नगर येथे जाऊन एका घरासमोरून मी सध्या वापरत असलेली मोटर सायकल चोरून आणल्याचे कबूल केले. त्याची खात्री केली असता पोलीस स्टेशन गांधी चौक येथे गुरं ३०२ /२०२१ ३७९ भादवी मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. सदर मोटारसायकल जप्त करून त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी लातूर शहरातील ट्युशन भाग दयानंद कॉलेज गेट, प्रकाश नगर, येथील दुकानाचे शटर कुलूप तोडून आत प्रवेश करून त्यातील रोख रक्कम व मोबाईल चोरी केल्याचे व इतर बरेच मोबाईल चोरी केल्याचे सांगितले. सदर चोरीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

# ऑक्सीजन पूरक झाडे लावा -प्रतिभा पाटील

**भिवंडी/प्रतिनिधी**

कोरोनाच्या काळात नागरिकांना ऑक्सीजनची आवश्यकता असते याची आता जाणीव झाली आहे, विशेष करून वड, पिंपळ, लिंब झाडांपासून नैसर्गिक पद्धतीने ऑक्सीजन मिळतो ही बाब लक्षात घेता, भारतीय प्रजाती असलेली ऑक्सीजनपूरक झाडे लावा, असे आवाहन महापौर प्रतिभा विलास पाटील यांनी केले. जागतिक पर्यावरण दिवसा निमित्ताने आर.आर. पाटील प्ले ग्राऊड (नाना नानी पार्क) आदर्शपार्क या परिसरात वृक्षरोपणचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी महापौर प्रतिभा पाटील बोलत होत्या. भारतीय प्रजाती असलेली झाडे मोठ्या प्रमाणात ऑक्सीजन देतात ही बाब लक्षात घेता ऑक्सीजन पूरक व पर्यावरण पूरक झाडे लावण्याचे आवाहन महापौर प्रतिभा पाटील यांनी केले आहे. जागतिक माणसांची पर्यावरणविषयक जाणीवांची कक्षा रुंद व्हावी, पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी, यासाठी पर्यावरण पोषक वातावरणाची निर्मिती होणं आवश्यक आहे. म्हणूनच आज 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा करण्यात येतो.



या निमित्ताने महापौर यांनी सर्व उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना पर्यावरण दिनानिमित्ताने निसर्गसंपदेचे जतन करु, पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी कटीबद्ध होऊ. प्रगतीच्या वाटेवर चालताना पर्यावरण संवर्धनाचे भान ठेऊयात, निसर्गाची अनमोल देणगी मनोभावे जपूया अशी शपथ दिली. या कार्यक्रमास शहर अभियंता लक्ष्मण गायकवाड, सहायक आयुक्त तथा उद्यान विभाग प्रमुख नितीन पाटील, प्रभाग समिती क्रमांक ५ चे सहायक आयुक्त गिरीष घोष्टेकर, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, पर्यावरण विभाग प्रमुख नितेश चौधरी, कोरोना योद्धा म्हणून काम करणारे प्रभाग समिती ५ चे मुख्य आरोग्य निरीक्षक शशिकांत घाडगे, आरोग्य निरीक्षक हरेश गायकवाड, सुमित कांबळे, निलेश शेलार तसेच उद्यान विभागातील कर्मचारी उपस्थित उपस्थित होते. कोरोना योद्धा म्हणून काम करणारे आरोग्य कर्मचारी यांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले.

# पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडरच्या महागाई विरोधात रिपब्लिकन सेनेचे देवणी तहसिलदार यांना निवेदन!



**देवणी/प्रतिनिधी**

शुक्रवार रोजी पेट्रोल, डिझेल, रसोई गैस दरवाढ कमी करण्यातबाबत रिपब्लिन सेनेचे लातुर (द) जिल्हाध्यक्ष प्रा.नरसिंग सुर्यवंशी यांच्या वतीने देवणी तहसिलचे नायब तहसिलदार विलास तरंगे यांना भाव वाढ कमि करण्यासाठी रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर साहेब याच्या आदेशाने निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरनामुळे दैनंदिन जीवनावश्यक वस्तूचे दर वाढून आभाळाला टेकलेले आहेत. त्याची भरपाई करण्यासाठी केंद्र सरकार तर्फे पेट्रोल, डिझेल, रसोई गॅसमध्ये अमाप दरवाढ करण्यात येत आहे. त्यामुळे ट्रान्सपोर्ट भाड्यामध्ये वाढ झाली असून दररोज दैनंदिन जीवनात येणाऱ्या वस्तू महागल्या गेल्या आहेत आणि या सर्व कारणामुळे देशातील आणि राज्यातील जनतेचं कंबरड मोडले गेले आहे.

एकीकडे महागाई तसेच कोरोना संकटाने देशातील जनता त्रस्त आहे आणि आपण नवीन प्रधानमंत्री आवास आणि ससंद भवन बांधन्याकरिता अरबो-खरबो रुपये खर्च करीत आहात महोदय देशात सध्या या आवासाची आणि भवनची गरज नसून देशातील जनतेचे प्राण वाचवणे महत्वाचे आहेत. म्हणून आपणास आम्ही या निवेदना मार्फत विंनती करीत आहोत कि आपण पेट्रोल, डिझेल आणि रसोई गैसचे दर कमी करावेत. तसेच दैनंदिन जीवनात येणाऱ्या वस्तूंचे भाव कमी होऊन जनतेला थोडा तरी दिलासा केंद्रसरकार कडून मिळेल. या मागनिचे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष नरसिंग सुर्यवंशी, लक्षमण रणदिवे, दिलीप शिंदे, गिरिध गायकवाड, अक्षय शिंदे, मधुकर काबंळे, अंगद गायकवाड यांच्या सह्या आहेत.

# रिक्षातून सहप्रवासी बनून चोरी करणाऱ्या महिलेस १२ तासात अटक



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीतून तक्रारदार महिला (रुक्मिणी उर्फ अंबिका भारत धोत्रे रा चिंचोली काटी ता मोहोळ जि सोलापूर) रिक्षा मधुन कोंडी ते एम.आय.डी.सी. पाकणी असा प्रवास करत असताना अज्ञात महिलेने त्यांच्या पर्स मधुन १ लाख ६० हजार रुपये किंमतीचे दागिने तसेच ४२ हजार पाचशे रोख रक्कम यातील अनोळखी चोरट्या महिलेने चोरल्याची फिर्याद सोलापूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन सोलापूर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रभारकर शिंदे, सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी अनोळखी महिला आरोपीचा शोध घेण्याकरीता सोलापूर तालुका पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पथक तयार करण्यात आले होते. आरोपींचे गुन्हे करण्याच्या पद्धतीवरून चोरीतील संशयित आरोपी (सुषमा बापूजी चव्हाण रा. बिस्मिल्लानगर मुळेगाव, ता.दक्षिण सोलापूर) मुळेगाव शिवारामध्ये मिळून आल्याने आरोपी महिलेकडून चोरलेले मुद्देमाल सर्व दागिने र्व दागीने (१,६०,००) तसेच ३३,००० रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. या चोरीचा गुन्हयाचा अधिक तपास पोलीस कॉन्स्टेबल बाळु राठोड हे करीत आहेत. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक अरूण फुगे, नेताजी बंडगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी तावरे, बाळु राठोड, सांजेकर, शशी शिंदे, फयाज बागवान, श्रीराम आदलींग, वैषाली कुंभार, सरस्वती लोकरे, सुनित चवरे, असिफ शेख, देवा सोलंकर किशोर सलगर, अशोक खवतोडे आदींनी कामगिरी केली.

# सातबाऱ्यावर नोंद घेण्यासाठीची जाचक अट रद्द करण्याची मागणी

**देवणी/प्रतिनिधी**



खुल्या फलाटची सातबाऱ्यावर नोंद करण्यासाठी खरेदीखताच्या किंमतीवरील २५% एवढी रक्कम भरण्याचे नियम राज्य सरकारने लागु केले आहे. या जाचक अटीमुळे अनेक गरीब कुटुंब शासकीय योजनेपासुन वंचित राहत आहेत. राज्य सरकारने खुल्या फलाट धारकांना मुळ जमीन मालकाच्या सातबाऱ्यावर नोंद घेण्याचा नियम संपुर्ण राज्यात लागु केला आहे. सातबाऱ्यावर नोंद घेण्यासाठी खरेदी खतामध्ये नमुद केलेल्या रकमेच्या २५% इतकी रक्कम सरकारी तिजोरीत भरल्यानंतरच फलाटची नोंद सातबाऱ्यावर घेतली जाते. या जाचक अटीमुळे अनेक गरीब कुटुंबातील लाभार्थी सरकारच्या विविध योजनेपासून वंचित आहेत. गरीब व सर्वसामान्य जनतेला २५% इतकि रक्कम भरणे शक्य नाही म्हणून ही अट रद्द करण्याची मागणी शकिल मनियार यांनी राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्याकडे निवेदनादवारे केली आहे. दरम्यान काही तालुक्यात तलाठ्याला पाच ते दहा हजार दिले तर हे नियम बाजुला सारुण सातबाऱ्यावर नोंद घेतली जाते २०१७ च्या जिआर नुसार २५% रक्कम भरावी असे सांगण्यात येते. परंतु २०१७ पासुन मार्च २०२१ पर्यत देवणी शहर व तालुक्यात मोठया प्रमाणात फेरची नोंद घेतली गेली आहेत.

# मनोर-वाडा महामार्गावर अपघात; एकाचा मृत्यू तर दोघे गंभीर जखमी

**वाडा/वार्ताहर**



मनोर-वाडा महामार्गावरील सापाने गावाच्या हद्दीत झालेल्या अपघातात दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला आहे तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत त्यांच्यावर मुंबई येथील रुणालयात उपचार सुरू आहेत. शुक्रवारी (४ जून) संध्याकाळच्या सुमारास एम.एच.०४ एफ.क्यू. १६९५ क्रमांकाच्या पॅशन या दुचाकीवरून तिघेजण वाड्याच्या दिसेना येत असताना सापना फाटा येथे समोरील ट्रक क्रमांक एम.एच.०६ के.२८९६ च्या चालकाने ट्रक अचानक वळवण्याचा प्रयत्न केला असता मागून येणाऱ्या दुचाकीचालकाचा ताबा सुटला व ती दुचाकी ट्रकवर जाऊन आदळली यात दुचाकी वरील तिघेही जखमी झाले त्यांच्यापैकी निलेश घरत (वय २०) रा.वावेघर याचा मृत्यू झाला आहे. दरम्यान वाडा पोलिसांनी ट्रकचालकास ताब्यात घेतले असून पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक जयेश खंदरकर अधिक तपास करत आहेत.

# माहिती जनसंपर्क सचिवांनी घेतली कोकणातील अतिवृष्टीचा आढावा!

**नवी मुंबई/प्रतिनिधी**



सचिव तथा माहिती व जनसंपर्कचे महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी आज कोंकण विभागीय माहिती कार्यालयाला भेट दिली. तसेच कोकण विभागात होणाऱ्या मुसळधार पावसाचा आढावा घेतला. विभागीय कोकण आयुक्त श्री.अण्णासाहेब मिसाळ यांच्याकडून ही माहिती घेतली. कोकण विभागात दोन दिवसाआधी पावसाचे आगमन झाले आहे. ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. दि. १० व ११ जूनला रायगड, पालघर व ठाणे जिल्हयात अतिवृष्टीचे संकेत हवामान खात्याने दिलेले आहे. आपातकालीन परिस्थितीची अचूक माहिती बातम्यांच्या स्वरुपात व इतर समाज माध्यमांव्दारे जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम विभागीय माहिती कार्यालय व त्यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत चोखपणे पार पाडले जाते. संभाव्य अतिवृष्टीच्या काळात बातम्यांच्या प्रसिध्दी विषयक कामांचे नियोजन व कोकण विभागात होणाऱ्या पावसाचा आढावा घेण्यासाठी डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी विभागीय माहिती कार्यालयास अचानक भेट दिली. यावेळी डॉ. पांढरपट्टे यांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कोरोना काळात प्रसिध्दीच्या कामात खंड न पडू देता काम केल्या बद्दल कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच येणाऱ्या काळातही कर्मचाऱ्यांकडून अश्याच कौतुकास्पद कामाची अपेक्षा व्यक्त केली. सोबतच कुटुंब प्रमुखाप्रमाणे पावसाळ्यात सर्व कर्मचाऱ्यांनी आपापल्या आरोग्याची काळजी घ्यावी व सुरक्षित राहावे अशा सुचनाही दिल्या. यावेळी कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी कोकण विभागाच्या कामकाजाचा अहवाल डॉ. पांढरपट्टे यांच्या समोर मांडला.

# शेतकऱ्यांनी ८० टक्के ओलावा असणाऱ्या जमिनीमध्ये भाताच्या पेरण्या कराव्यात

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यात पाऊस झालेला असून खरीप हंगमातील पेरणीला सुरुवात झाली आहे. तरी शेतकऱ्यांनी ८० टक्के ओलावा असणाऱ्या जमिनीमध्ये भाताच्या पेरण्या कराव्यात. भात रोपवाटिका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये जमीन नांगरून ढेकळे फोडावीत. प्रति गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन उंच नीच-याच्या जागी तळाशी १२० से मी लांबी ते ९० से.मी. रुंदी व ८ ते १० से. मी उंचीचे उतारानुसार पेरणी योग्य लांबीचे गादीवाफे तयार करावेत. जर शेतकरी स्वतःकडे राखून ठेवलेले भात बियाणे पेरणीसाठी वापरणार असतील तर त्यांनी बियाण्यास ३ टक्के मीठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. यासाठी १० लिटर पाण्यामध्ये ३०० ग्रॅम मीठ टाकून द्रावण तयार करावे. द्रावण तयार करताना उपलब्ध भात बियाणे त्यामध्ये बुडेल असे द्रावण तयार करावे. बियाणे द्रावणात टाकल्यावर चांगले ढवळावे. चाळणीच्या सहाय्याने तरंगणारे बियाणे वेगळे करावे. जड व तळाला बसलेले बियाणे वेगळे काढून स्वच्छ पाण्याने ३ ते ४ वेळा धुवून ते ४८ तास सावलीत वाळवावे. दि. १० जून २०२१ ते १२ जून २०२१ या दरम्यान पालघर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता हवामान खात्याकाडून वर्तविण्यात आली आहे. तरी भात खाचराच्या उताराच्या दिशेने पाणी निचरा होण्यासाठी सांडवा (पाणी जाण्यासाठी मार्ग) ठेवण्यात यावा. त्यामुळे शेतातील पाणी निचरा होण्यास मदत होईल. शेतकऱ्यांनी सावधानगिरी बाळगावी व आपल्या पशुधनाला सुरक्षित ठिकाणी हलवावे. तसेच वाळलेल्या चारा पावसात भीजू नये म्हणून सूरक्षीत ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी के. बी. तरकसे यांनी केली आहे.

# देवणीतील वलांडी येथे डिएपी खताची कृत्रिम टंचाई; कृषी अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष!

**देवणी/शकिल मनियार**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील व्यापाऱ्याने डिएपी खताची कृत्रिम टंचाई निर्माण केरुण त्याची चढ्या दराने विक्री केली जात आहे. तालुका कृषी अधिकारी मनेजची भुमिका घेत असल्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पीळवणुक केली जात आहे. मृग नक्षत्राचा पेरणी योग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांत बि-बियाणे व रासायनिक खते खरेदी करण्याची लगभग सुरू झाली आहे. कोरोनाने वैतागलेला शेतकरी पेरणीचे साहित्य खरेदी करण्यासाठी खाजगी सावकार व विविध बँकेकडून कर्जे घेऊन काळ्या आईची ओटी भरतात. परंतु बियाणे व खते विक्रते शेतकऱ्यांना खते व बियाणांची अधिक दराने विक्री करून सर्रासपणे लुबाडणुक केली जात आहे. त्यामुळे शासनाने दिलेल्या नियमावलीचे उल्लंघन होत आहे. तालुका कृषी अधिकारी यांच्या आशीर्वादाने व्यापाऱ्यांत मुजोर पणा वाढला आहे. तालुक्यातील सर्वच खते व बियाणे विक्रते दुकानदाराची चौकशी करून त्यांच्याकडे उपलब्ध असणारा स्टाक विक्रीची किंमत सार्वजनिक करावी, त्यांच्या कडे असणारे बिलबुक जिल्हा कृषी अधिक्षक अधिकाऱ्यांकडुन तपासुनच प्रमाणीत करून त्या बिलबुकाच्या पावत्या शेतकऱ्यांना देण्यात याव्यात अशी मागणी देवणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडुन होत आहे. कृषि मंत्री दादाजी भुसे यांनी कोरोना काळात वेशांतर करून औरंगाबाद येथील खत विक्री दुकानात जाऊन माहिती घेतली. व्यापारी शेतकऱ्याची पिळवणूक करतात याची माहिती मिळाली. व तातडीने कृषि अधिकाऱ्याला बोलावून संबंधित खत विक्रेते यांच्यावर गुन्हेही दाखल केले होते.



### पोलिसांच्या घरांसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून विशेष धोरण लवकरच

# राज्यभरात पोलिसांसाठी दोन लाख हक्काची घरे निर्माण करण्याचे उद्दिष्ट



**मुंबई/प्रतिनिधी**

पोलिसांना त्यांच्या हक्काची घरे मिळवून देण्यासाठी नगरविकास विभाग विशेष धोरण तयार करत असून गृह आणि गृहनिर्माण या विभागांच्या समन्वयाने लवकरच त्याला अंतिम स्वरूप देऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या समोर मांडले जाईल, असे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. पोलिसांच्या घरांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागून निवृत्तीनंतर त्यांची घरासाठीची वणवण थांबावी, यासाठी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात गुरुवारी एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पोलिसांसाठी विशेष गृहनिर्माण धोरण तयार करण्याला तत्त्वतः मंजुरी देण्यात आली. सद्यस्थितीत राज्यातील दीड लाख पोलिस हक्काच्या घरापासून वंचित आहेत. त्याना घरे मिळवून द्यायची असल्यास तेवढ्या मोठ्या संख्येने घरांची निर्मिती करण्याची गरज आहे. यासाठीच शॉर्ट टर्म, मिडीयम टर्म आणि लाँग टर्म अशा तीन टप्प्यात या धोरणाचे प्रारूप तयार करण्यात आले आहे. त्यासोबतच पोलिसांना सेवा बजावताना लागणारी सेवा निवासस्थाने आणि निवृत्तीनंतर लागणारी मालकी हक्काची निवासस्थाने अशी दुहेरी गरज लक्षात घेऊनच या योजनेचे अंतिम स्वरूप तयार करण्यात येणार आहे. पोलिसांसाठी घरे निर्माण करण्याचे अनेक पर्याय या बैठकीत समोर आले असून गृह विभाग व गृहनिर्माण विभागाच्या समन्वयाने या धोरणाला अंतिम रूप दिले जाईल. शासनाला मिळत असलेला हाऊसिंग स्टॉक आणि इतर योजनांमधून उपलब्ध होणारी घरे वगळता अजून घरे पोलिसांना कशी उपलब्ध करून देता येतील, याला सरकारचे प्राधान्य असल्याचे श्री. शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. या बैठकीस गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली पोलीस मुख्यालयातील नुतनीकरण केलेल्या इमारतीची पाहणी

### कोरोना संसर्गाने मृत्यू पावलेल्यांच्या पाल्यांना दिली नियुक्ती पत्रे



**पुणे/प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयातील नुतनीकरण केलेल्या इमारतीचे उद्घाटन करुन केलेल्या कामाची पाहणी केली. कोरोना काळात सेवेत केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव तसेच या सेवा काळात ज्यांचा कोरोना संसर्गाने मृत्यू झाला त्यांच्या पाल्यांना पोलीस दलात नेमणूक पत्र त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सह पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. जालिंदर सुपेकर, पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, श्रीमती स्वप्ना गोरे, मितेश घट्टे, प्रियांका नारनवरे, सहायक पोलीस आयुक्त सतिश गोवेकर यांसह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कर्तव्यावर असतांना कोरोना विषाणूची लागण झाल्याने मृत्यू झालेल्या अमंलदाराच्या तीन पाल्यांना अनुकंपातत्वावर नियुक्तपत्र देवून पोलीस दलात नेमणूक करण्यात आली. त्यामध्ये सामेश संतोष म्हेत्रे, अभिजीत आनंद गायकवाड, प्रसाद दिलीप वावरे यांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कोरोनाच्या काळात चागंली कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करुन गौरव करण्यात आला. त्यामध्ये पोलीस निरिक्षक विजय पुराणिक, पोलीस उपनिरीक्षक गौरव देव, सहा पोलीस निरीक्षक सुहास टिळेकर, पोलीस नाईक, उत्तम गाडे, गौरव कांबळे, शिपाई रेणुका भांगरे यांचा समावेश आहे. पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथील नुतनीकरणच्या वेळी चांगली कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच कंत्राटदार यांना प्रशस्तीपत्र प्रदान करुन गौरव करण्यात आला.

# वाड्यात अंगणवाडी सेविकेची हत्या

## चोरीच्या उद्देशाने हत्या झाल्याचा संशय

**वाडा/वार्ताहर**

तालुक्यातील सापणे या गावातील एका महिलेची रात्रीच्या सुमारास निर्घृण हत्या करण्यात आली असून चोरट्याने चोरीच्या उद्देशाने घरात प्रवेश करून महिलेची हत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याबाबत खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेण्याचे काम वाडा पोलीस करीत आहेत.



सुप्रिया गुरुनाथ काळे, वय ४५ ही महिला आपल्या कुटुंबासह सापणे खुर्द गावात राहत असून पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार सुप्रिया काळे यांची मुले इतर खोल्यांमध्ये व सुप्रिया या हॉल मध्ये झोपल्या होत्या तर त्यांचे पती हे बाहेर ओसरीवर झोपले होते. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने घराच्या मागच्या खिडकीतून घरात प्रवेश केला व हॉल मध्ये झोपलेल्या सुप्रिया यांच्यासोबत त्याची झटापट झाली. यावेळी चोरट्याने सुप्रिया यांच्या गळ्यावर व कानावर अज्ञात हत्याराने वार करून त्यांची हत्या केली व त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र, कानातील कुडी व मोबाईल असे एकूण ६२ हजार रुपयांचा ऐवज घेऊन चोर पसार झाला आहे. याबाबत वाडा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोकण विभागीय उप महानिरीक्षक संजय मोहिते, अप्पर पोलीस अधीक्षक प्रकाश गायकवाड, पालघर पोलीस अधीक्षक दत्तात्रेय शिंदे, यांच्यासह पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत परदेशी घटनास्थळी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधीर संखे अधिक तपास करत आहेत.

# लांबोटा ते तोगरी रस्त्याचे काम बंद; विविध संघटना आंदोलनाच्या पवित्र्यात

**देवणी/शकिल मनियार**

लांबोटा देवणी तोगरी रस्त्याचे काम गेल्या महिनाभरापासून बंद असल्यामुळे चांगला असलेला रस्ता खोदून ठेवल्याने अनेक नागरिक पडून जखमी झाले आहेत. त्यामुळे त्वरित या रस्त्याचे काम पूर्ण करावे अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशारा सार्वजनिक बांधकाम विभाग उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती, स्वाभिमान युवा मंच, आणि जयसंघर्ष वाहन चालक संघटना यांच्या वतीने देण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या पावसात अनेक दुचाकी वाहने घसरून अपघात होत असल्यामुळे नागरिकांतून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

सदरील कामाची चौकशी करून संबंधित गुत्तेदार व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, गुत्तेदार व कामावर नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्याची मिलीभगत असल्याने कामाचा दर्जा घसरला आहे या कामाचे ज्या कांत्रटदाराकडून टेंडर घेण्यात आले आहे. त्या कांत्रटदाराकडून रस्त्याचे काम करण्यामध्ये मोठा हलगर्जीपणा झाला असून, पूर्ण रस्ता उकरून त्यावर काळी माती टाकण्यात आली आहे. त्यावर प्रत्येक वाहन घसरत आहेत आणि नागरिक जखमी होत आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूने खोदकाम केल्यानंतर मुरूम खडक घालण्या ऐवजी जी माती खोदकाम केल्यानंतर निघते तीच माती टाकून चांगल्या रस्त्याची देखील वाट लावण्यात आली आहे. पावसाळ्यात चिखलच चिखल होत तर उन्हाळ्यात धूळच धूळ होत आहे. त्यामुळे वाहनचालकांना आपला जीव मूठीवर घेऊन वाहन चालवावे लागते. दररोज वाहने घसरून जखमी होणाऱ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणात असून लोकप्रतिनिधी देखील हा प्रकार पाहून शांत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

या रस्त्याचे काम संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांनी संगनमत करून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केल्याने या कामाची




गुणनियंत्रण पथकामार्फत चौकशी करून संपूर्ण प्रकरणाची शहानिशा करून कामात ज्या त्रुटी आढळल्यास त्या दोषी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकावे व जे अधिकारी पदाचा गैरवापर करून ते कांत्रटदाराशी संगणमत करून निकृष्ट दर्जाचे काम केले आहेत, अशा दोषी अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करावी व कामाचे बिल देयक चौकशी पूर्ण होईपर्यंत रोखण्यात यावे अशी मागणी अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधी समीतीने निवेदनादवारे केली आहे.

मात्र याकडे स्थानिक आमदाराने दुर्लक्ष का केले असावे असे कोडे वाहनधारकांना पडले आहे. या दर्जाहिन कामाची गुणवत्ता नियंत्रक विभागाच्या उच्चस्तरीय समितीने तपासणी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखवावा कंत्राटदाराला काळया यादीत समाविष्ट करण्यात यावी अशी मागणी अन्याय, अत्याचार व भ्रष्टाचार विरोधी समिती, स्वाभिमान युवा मंच, जयसंघर्ष वाहन चालक संघटना अश्या अनेक संघटनांनी केली आहे.

# अवैध वृक्षतोड केल्याप्रकरणी एक लाखांचा दंड वसूल!



**लातूर/प्रतिनिधी**

कायद्याने झाडे तोडण्यास मनाई असताना परवानगी न घेता अनधिकृतपणे घरातील २ झाडे तोडल्याबद्दल महानगरपालिकेच्या वतीने संबंधित नागरिकाला १ लाख रुपयांचा दंड करण्यात आला. क्षेत्रीय कार्यालय क्र. बी मार्फत ही धडक कारवाई केली. झाडे तोडण्यास मदत करणाऱ्या पालिकेच्या उद्यान विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यालाही १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

याबाबत अधिक माहीती बशी की, शहरातील शिवाजीनगर भागात मुंदडा स्टील वर्क्सच्या समोर सौ.पुष्पा ओमप्रकाश सोमाणी यांचे निवासस्थान आहे.या घरात बदामाची ३० फूट उंचीची व २३ इंच व्यास असणारी २ झाडे होती. अंदाजे १० वर्षांपूर्वी लावलेली ही झाडे असावीत. सोमाणी यांनी कसलीही परवानगी न घेता गुरुवारी (दि.१० जुन) ही दोन्ही झाडे तोडून टाकली. याची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय क्र. बी ने तेथे धाव घेतली. घटनेची प्रत्यक्ष पाहणी केली असता दोन्ही झाडे पुर्णपणे तोडून टाकल्याचे निदर्शनास आले.सोमाणी यांनी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ या कलमाचे उल्लंघन केल्याचे आढळून आले.नियमांचे उल्लंघन केल्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने प्रति झाड ५० हजार रुपये याप्रमाणे २ झाडांसाठी सोमाणी यांना १ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला. संबंधितांकडून रक्कम वसूल करण्यात आली. ही झाडे तोडण्यासाठी मनपाच्या उद्यान विभागातील कंत्राटी कर्मचारी शब्बीर बासू शेख याने सोमाणी यांना मदत केल्याचे निदर्शनास आले.त्यामुळे त्यानाही १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. पालिका आयुक्त अमन मित्तल यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी संजय कुलकर्णी यांनी हि कार्यवाही पार पाडली. झाडे लावणे व त्याचे जतन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. झाडांशिवाय मानवाला ऑक्सिजन मिळू शकत नाही.लातूर शहराला हरित व सुंदर करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. नागरिकांनी स्वतः वृक्षारोपण करून यात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे.त्यामुळे नागरिकांनी वृक्षतोड करू नये. अत्यावश्यक परिस्थितीत झाड तोडणे गरजेचे असेल तर त्यासाठी महानगरपालिकेकडून रीतसर परवानगी घ्यावी. परवानगी न घेता वृक्षतोड केली तर दंड ठोठावण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त अमन मित्तल यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# माझं लातूर कोव्हिड मदत केंद्र राज्यात एक आदर्श उदाहरण-महापौर




**लातूर/प्रतिनिधी**

माझं लातूर कोव्हिड मदत केंद्र राज्यात एक आदर्श उदाहरण ठरलेले आहे. या मदत केंद्रामुळे प्रशासनाचा महापालिकेचा ताण कमी झाला असे प्रतिपादन महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केले. लातूर येथील शाहू प्रतिष्ठान आणि सह्याद्री प्रतिष्ठान च्या वतीने कोविड -१९ मध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल माझं लातूर समूहातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी मनोगत व्यक्त करताना महापौर विक्रांत गोजमगुंडे बोलत होते.

याप्रसंगी ॲडवोकेट बळवंत जाधव, गुरुनाथ मगे देविदास, काळे अविष्कार गोजमगुंडे, डॉक्टर पठाण, रवी सुर्वे यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना महापौर विक्रांत गोजमगुंडे म्हणाले आपत्ती ओसरल्यानंतर ज्यांनी आपत्तीमध्ये लोकांना सावरण्याचे काम केले त्यांचा सन्मान होणे गरजेचे आहे. माझं लातूर या वॅटसप ग्रुपचे मदत कार्य मोठ्या प्रमाणात झाले. माझं लातूर कोविड मदत केंद्र राज्यात एक आदर्श उदाहरण ठरले आहे. खरतर माझं लातूर वॅटसप ग्रुपच्या सदस्यांनी कोव्हिड मदत केंद्र सुरू करून राजकारणी आणी अधिकारी यांच्या निर्णयातील उणीवा दाखवून त्यात सुधारणा करता येतील का यावर सकारात्मक चर्चा करून त्या दूर करण्याचे काम करण्याचे काम केले. माझं लातूर कोविड मदत केंद्रामुळे प्रशासन आणि महापालिकेचा ताण कमी झाला. माझं लातूरने केवळ हेल्पलाइन सुरू केली नाही तर रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवारा केंद्र सुरू केले निधी संकलन करून ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेट सुविधा उपलब्ध करून दिली. लातूर मधील सगळ्या समाज घटकांनी एकत्र येऊन केलेल्या कामामुळे कोरोनाच्या दुसऱ्या लाटेच्या संकटावर मात करता आली. कोरोना ची तिसरी लाट येणार आहे असे तज्ञ सांगत आहेत. त्याची आव्हाने वेगळी राहणार आहेत. त्यासाठी पण सर्वांनी खंबीरपणे काम करण्यास तयार रहवे असे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केले. यावेळी ॲडवोकेट बळवंत जाधव, गुरुनाथ मगे, देविदास काळे, रवी सुडे, तम्मा पावले, सितम सोनवणे यांनी ही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संयोजक डॉक्टर आनंद कलमे, भगवंत कदम, निरंजन रेड्डी, मनोज दुधाटे, प्रमोद गुडे यांच्यासह शाहू मित्र मंडळ व सह्याद्री प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा मंजूर करा -माजी मंत्री विनायकराव पाटील

**अहमदपूर/प्रतिनिधी**

यावर्षी अहमदपूर व चाकुर तालुक्यात अति पावसामुळे व दूषित वातावरणामुळे सोयाबीन पिकाचे खूप नुकसान झाले आहे. तालुक्यात अवेळी पाऊस, धुई पडून तुरीचा व कापसाचा चक्क खराटा झाल्यामुळे शेतकऱ्यांचे चांगलेच कंबरडे मोडले असल्याने विमा कंपनीने शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा मंजूर करावा अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सदस्य तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांना उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे यांच्या मार्फत केली आहे.




गतवर्षी नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे महसूल विभाग व कृषी विभागाने केले होते. त्या आधारे शासनाने नुकसान भरपाईचे अनुदान शेतकऱ्यांना दिले होते. तेच पंचनामे ग्राह्य धरून विमा कंपनी कडून पिक विमा मंजूर करून घ्यावा अशी विनंती मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांना निवेदनाद्वारे केली. काही शेतकऱ्यांनी नुकसान झालेल्या पिकांचे फोटो ऑनलाईन कले आहेत तर अनेक शेतकऱ्यांनी फोटो आँनलाईन केले नाहीत तरी सर्व शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा मंजूर करावा. तसेच लॉकडाऊन काळातील सरसकट विजबिल माफ करावे अशीही मागणी करण्यात आली आहे. पिकाने यावर्षी शेतकऱ्यांना चांगला दगा-फटका दिल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून त्यांनी शेतीत केलेला खर्चसुद्धा यावर्षी निघाला नाही. अशा शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन एका शिष्टमंडळाद्वारे भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सदस्य तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी अहमदपूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांच्या कडे केली आहे.

सदरील पिक विमा मंजूर न झाल्यास अहमदपूर व चाकुर तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सदस्य विनायकराव पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे, त्र्यंबक गुट्टे, राजाभाऊ मजगे, अशोकराव चिंते, आर.डी शेळके, हरीभाऊ येरमे, विठ्ठलराव बोडके, संग्राम चामे, प्रशांत पाटील, शिवाजी बैनगिरे, हणमंत देवकते, राम बेल्लाळे, कमलाकर पाटील, निळकंठ पाटील, राजू खंदाडे, गोविंद गिरी, देवानंद मुळे, अमित रेड्डी, अजय काळे, प्रेमचंद शेळके, शिवराज पाटील, चंदकांत गंगथडे, प्रमोद जोशी, अजित खंदारे, सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, विक्रम भोसले, राहुल शिवपुजे, निखिल कासनाळे, धनराज पाटील, कमलाकर शेकापुरे, शुकूर जागीरदार, सुखदेव कदम, चंद्रसेन पाटील, प्रताप पाटील, संतोष कोटलवार, शिवराज चोथवे, अर्जुन गंगथडे, शंकर मुळे, शंकर चाटे, पांडुरंग कांबळे, आदिंसह शेतकरी व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## सफाई कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणाची मागणी

वाडा : वाडा नगरपंचायत अस्तित्वात येऊन तीन वर्षे लोटले मात्र आज पर्यत शहरातील घाण-कचरा उचलणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा उपकरणे दिली नसल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. नगरपंचायती कडे एकूण २ ट्रॅक्टर ट्रॉली, ७ घंटा गाड्या, ९ लोट गाड्या असून एकूण ३५ सफाई कर्मचारी कार्यरत आहेत. हे कर्मचारी सकाळी ७ वाजल्यापासून दुपारी ३ वाजेपर्यत शहरातील प्रत्येक नगराच्या गल्ली बोळातून कचरा उचलून शहर दुर्गधीमुक्त ठेवण्याचे काम करतात. सध्या पावसाचे दिवस असून त्यांना साधा रेनकोट उपलब्ध नसल्याने ते पावसात भिजतच कचरा उचलण्याचे काम करत आहेत. त्यांच्या आरोग्याचा विचार करता त्यांना गमबूट, हॅन्डग्लोज, मास्क, रेनकोट अशा साधनांची पूर्तता करणे गरजेचे आहे. एवढेच नाही तर अधून मधून या कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्याचीही मागणी होत आहे.